पोलीस स्टेशन देसाईगंज जि.

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

**1. District (जिल्हा):** गडचिरोली **P.S.(ठाणे):** देसाइगंज **Year (वर्ष):** 2021

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0619 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 18/11/2021 17:19 बजे

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 17/11/2021

**Date To ( दिनांक पर्यंत):** 18/11/2021

**Time From (वेळेपासून):** 16:02 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 13:35 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 18/11/2021 **Time (वेळ):** 17:07 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 021 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 18/11/2021 17:07 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

**1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** दक्षिण, 01 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** विज वितरण केंद्र कार्यालय देसा,देसाईगंज, 441207

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** रमितसिंग प्रितमसिंग अरोरा

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1989 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

पोलीस स्टेशन देसाईगंज



**(h) Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रा विर्शिवार्ड देसाईगंज,देसाईगंज,देसाइगंज,गडचिरोली,महाराष्ट्र,441207,भारत |
| 2 | स्थायी पता | रा विर्शिवार्ड देसाईगंज,देसाईगंज,देसाइगंज,गडचिरोली,महाराष्ट्र,441207,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | निलेश मारोती भोवरे | | | 1. विज वितरण केंद्र, देसाईगंज,, देसाईगंज,,देसाइगंज,गडचिरोली,महाराष्ट्र, भारत-441207 |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | पाचशे रुपयाचे सोळा नोटा | 8,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 8,000.00

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक 18/11/2021मी श्री रमितसिंग प्रितमसिंग अरोरा, वय 32 वर्षे, जात-षिख (ओपन), धंदा-षोरुम चालक, मु.पो.ता. विर्षीवार्ड, ब्रम्हपूरी रोड देसाईगंज ता. देसाईगंज जि. गडचिरोली. मो.नं. 9765280007. .मी दिनांक 17/11/2021 रोजी पोलीस निरीक्षक, श्री यषवंत राऊत, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय गडचिरोली कम्प देसाईगंज यांचे समक्ष लोकसेवकांविरूद्ध लाच मागणी संबंधाने तक्रार नोंदविली. पोलीस निरीक्षक श्री यषवंत राऊत यांनी माझे सांगण्याप्रमाणे माझी तक्रार माझे हस्ताक्षरात लिहून त्यावर माझी सही घेतली. मी नोंदवलेली तक्रार खालीलप्रमाणे आहे. दिनांक 16.11.2021 रोजी मौजा देसाईगंज येथील तुकुमवार्ड संगम कपडा बाजारच्या बाजुला माझे सासरे यांनी भेट दिलेल्या जागेवर दुकान गाळे बांधकाम करावयाचे असल्याने विद्युत मिटरची आवष्यकता असल्याने मी सिंगल फेज कमर्षियल नविन विद्युत मिटर मंजुर होवुन लावुन मिळणेकरीता ऑनलाईन प्रक्रीया पुर्ण करून कागदपत्र महाराश्ट्र राज्य विद्युत महामंडळ कंपनी देसाईगंज येथील कार्यालयात सादर केले व श्री. भोवरे, उपअभियंता साहेब यांना भेटुन माहिती दिली असता त्यांनी मला तुमचे मिटर मंजुर करुन लावुन देण्याचे काम माझेकडेच आहे, तुम्हाला मिटर लवकर लावुन पाहीजे असेल तर मला 10,000/- रु दयावे लागतील. त्यावर मी त्यांना म्हणालो की, साहेब, गाळा बांधकामाचे काम लवकर सुरु करावयाचे आहे व त्यासाठी लवकर मिटरची आवष्यकता आहे. पैसा खुप फसलेला आहे. काही कमी करा. असे म्हणालो असता त्यांनी नाही जमत असेल तर माझे कडे खुप कामे आहेत असे म्हणाले. तेव्हा विद्युत मिटर लवकर मंजुर करुन लावुन देणार नाहीत म्हणुन घाबरुन मी ठिक आहे साहेब, आता सध्या माझ्याकडे 10,000/- रु नाहीत, जमवुन येवुन भेटतो, असे म्हणालो. त्यावर त्यांनी ठिक आहे असे म्हणुन त्यांनी मला पैषाची मागणी केली आहे. श्री भोवरे साहेब, उपअभियंता, महाराश्ट्र विद्युत महावितरण कार्यालय, देसाईगंज यांनी माझ्या दुकान गाळे बांधकामाचे जागेवर विद्युत मिटर मंजुर करुन लावुन देण्याचे कामाकरिता रू. 10,000/- लाच रक्कमेची मागणी केली आहे. श्री भोवरे साहेब, उपअभियंता, महाराश्ट्र विद्युत महावितरण कार्यालय, देसाईगंज यांना रु. 10,000/- लाच रक्कम देण्याची माझी मुळीच ईच्छा नसल्याने मी माझे वैयक्तीक दैनंदीन बचतीतील रु. 10,000/- सोबत घेऊन आपले कार्यालयामार्फत कारवाई होणेकरीता स्वेच्छेने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गडचिरोली कम्प देसाईगंज येथे तक्रार देण्यास आलो. श्री भोवरे साहेब, उपअभियंता, महाराश्ट्र विद्युत महावितरण कार्यालय, देसाईगंज यांचेषी माझे कोणतेही वैयक्तीक वैर नसुन आर्थिक देवाण-घेवाण/उसणवारी अथवा भांडण नाही. म्हणुन मी त्याचे विरुध्द कायदेषिर कारवाई करण्याकरीता स्वेच्छेने तक्रार देत आहे.त्यानंतर श्री राऊत, पोलीस निरीक्षक यांनी 2 शासकिय पंचांना पाचारण करून त्यांची व माझी एकमेकांना ओळख करून दिली. श्री राऊत यांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकिकत सांगुन माझा लेखी तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. त्यानंतर सदरच्या तक्रार अर्जावर दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर श्री राऊत, पोलीस निरीक्षक

यांनी सुद्धा स्वाक्षरी केली. पंचासमक्ष श्री राऊत, पोलीस निरीक्षक यांनी व्हईस रेकर्डर कष्याप्रकारे काम करतो. याबाबत सविस्तर माहीती देवुन लाच मागणीची पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हईस रेकर्डरद्वारे रेकर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले आणि सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर श्री राऊत, पोलीस निरीक्षक यांनी माझेकडुन सापळा कारवाईसाठी वापरण्यात येणारी लाच रक्कम रू. 10,000/- (रू. 500/- दराच्या 20 चलनी नोटा) घेतले. त्यावेळी सदरच्या नोटांचे क्रमांक नोंदवुन घेण्यात आले. त्यानंतर सदरच्या नोटांना अॅथ्रसिन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्यांचे गुणधर्म व प्रात्यक्षीक करून दाखवुन लाचेच्या रक्कमेस अॅथ्रसिन पावडर लावली. याबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी श्री राऊत यांनी पंचनामा क्रं. 1 मध्ये घेतल्या आहेत. दिनांक 17/11/2021 रोजी श्री राऊत, पोलीस निरीक्षक यांनी पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन त्याप्रमाणे व्हईस रेकर्डर सुरू करून व्हईस रेकर्डरवर पंच क्रं. 1 यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हईस रेकर्डर माझे ताब्यात देवुन मला पंच क्रं. 1 यांचेसह गै.अ. श्री भोवरे, उपअभियंता यांचेकडे जाण्यास रवाना केले. गै.अ. श्री भोवरे, उपअभियंता यांनी पंच क्रं. 1 यांचे समक्ष मला माझ्या दुकान गाळे बांधकामाचे जागेवर विद्युत मिटर मंजुर करुन लावुन देण्याचे कामाकरिता रू. 10,000/- रक्कमेची मागणी करून तडजोडीअंती रु. 8,000/- लाच रक्कम उदईक रोजी स्विकारण्याची तयारी दर्षविली. त्यानंतर पंच क्रं. 1 यांच्या आवाजानंतर व्हईस रेकर्डर बंद करण्यात आला. पोलीस निरीक्षक श्री राऊत यांनी पंच क्रं. 1 व 2 यांचेसमक्ष व्हईस रेकर्डमध्ये झालेले संभाषणाची टेप ऐकुण गै.अ. श्री भोवरे, उपअभियंता यांनी मला माझ्या दुकान गाळे बांधकामाचे जागेवर विद्युत मिटर मंजुर करुन लावुन देण्याचे कामाकरिता रू. 10,000/- रक्कमेची मागणी करून तडजोडीअंती रु. 8,000/- लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्षविल्याची खात्री केली. त्यावरून गै.अ. श्री भोवरे, उपअभियंता यांचेविरूद्ध दिनांक 18.11.2021 रोजी सापळा कार्यवाही आयोजीत करण्याचे ठरविण्यात आले. याबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी यांनी पडताळणी व सापळा स्थगीती पंचनामा क्रं. 2 मध्ये घेतल्या आहेत. त्यानंतर दिनांक 18.11.2021 रोजी मला पंचासमक्ष अॅथ्रसिन पावडर लावलेली लाचेची रक्कम देण्यात आली. ती माझे फुलपन्टचे उजवे बाजुचे खिष्यात ठेवण्यात आली. सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना देवुन लोकसेवक यांनी स्वतः किंवा इतर व्यक्तीच्या माध्यमातुन लाच रक्कम स्विकारल्यावर दर्षनी भागी येवून डोळ्याला लावलेला चश्मा काढुन डोळे पुसावे असा इषारा करण्याबाबत मला सांगीतले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य इषारा मिळताच लाच रक्कम स्विकारणा-यास रंगेहाथ पकडतील असे सांगण्यात आले. पोलीस निरीक्षक श्री राऊत यांनी व्हईस रेकर्डर सुरू करून व्हईस रेकर्डरवर पंच क्रं. 1 यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हईस रेकर्डर माझे ताब्यात देवुन मला पंच क्रं. 1 यांचेसह महाराश्ट्र विद्युत महावितरण कार्यालय, देसाईगंज येथे गैरअर्जदार श्री भोवरे उपअभियंता यांचेकडे जाण्यास रवाना केले. त्याचवेळी सापळा पथकातील काही सदस्य गटा-गटाने माझे मागोमाग आले. मी महाराश्ट्र विद्युत महावितरण कार्यालय, देसाईगंज समोर जावुन गैरअर्जदार श्री भोवरे यांचे यांचे मोबाईलवर फोन करुन येत असल्याबाबत सांगितले असता त्यांनी या मी ऑफीसमध्ये आहे असे सांगितले. मी कार्यालयात गेलो असता गैरअर्जदार हे हजर मिळाले व त्यांनी लाचेची रक्कम मागीतल्याने मी अॅथ्रसिन पावडर लावलेली रू. 8,000/- लाचेची रक्कम माझे फुलपंटच्या उजवे बाजुच्या खिष्यातुन काढुन श्री भोवरे, उपअभियंता यांना दिल्या असता, त्यांनी लाच रक्कम रू. 8,000/- आपल्या हाताने घेवुन दोन्ही हातांनी मोजून आपल्या फुलपंटच्या समोरील डावे बाजुचे खिषात ठेवले त्याचवेळी मी पंच क्रं. 1 सोबत दर्षनी ठिकाणी येवुन सापळा पथकास माझे डोळ्याला लावलेला चश्मा काढुन डोळे पुसुन लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजीत इषारा केला. त्याचवेळी सापळा पथकाने गैरअर्जदार श्री भोवरे उपअभियंता यांना रंगेहात पकडुन पुढील कारवाई केली. सापळा कार्यवाहीबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री राऊत यांनी पंचनामा क्रं. 3 मध्ये घेतल्या आहेत. तरी लोकसेवक श्री निलेष मारोती भोवरे, वय 37 वर्षे, धंदा नौकरी, सहाय्यक अभियंता, वर्ग-2, महाराश्ट्र राज्य विज वितरण कंपनी, षहर विज वितरण केंद्र, देसाईगंज, जि. गडचिरोली यांनी आपल्या लोकसेवक पदाचा दुरूपयोग करून मला माझ्या दुकान गाळे बांधकामाचे जागेवर विद्युत मिटर मंजुर करुन लावुन देण्याचे कामाकरिता रू. 10,000/- लाच रक्कमेची मागणी करून तडजोडीअंती रु. 8,000/- लाच रक्कम स्विकारली. म्हणुन माझी त्यांच्याविरूद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यानुसार कायदेषीर फिर्याद आहे. माझी वरिल फिर्याद मराठीत संगणकावर टंकलिखीत केली असुन प्रिंट काढल्यानंतर मी वाचुन पाहीली. ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**

**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** YASHWANT KISAN RAUT
**Rank (पद):** I (Inspector)

**No.(क्र.):** DGPYKRM6401 **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): mahesh namdeo meshram
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): dgpmnmm8101

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**